## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२९/२०२५ मधील नि. क्र.५० वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज वादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी याने अर्जासोबत त्याचे शपथपत्र नि.क्र.५१ दाखल केले आहे.

०२. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल करणेत आलेला आहे. वादी पुढे असे कथन करतो की, प्रस्तुत दावा दाखल झाल्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांनी दावा मिळकत न. पं. मि. नं. -- रि. स. नं. ४७४/८ चे व्हॅल्युएशन चुकीचे असल्याची तक्रार उपस्थित केली आहे. त्यावर न्यायालयाने व्हॅल्युएशन करुन दावा दुरुस्त करणेबाबत आदेश केला आहे. त्या अनुषंगाने वादी सदरची दावा दरुस्ती करत आहेत. वादीचे दावा कलम ७ मधील मजकुर की, ''---- दावा परीच्छेद १ब अ. नं. १ ची किंमत रु. १,००,०००/- यास काट देऊन त्याऐवजी रु. ८४,७१,०४८/- पैकी वादीचा १/४ हिस्सा याची किंमत रु. २५,०००/- यास काट देऊन त्याऐवजी रु. २१,१७,७६२/- असे लिहीण्यास तसेच त्यापुढील ''दावा किंमत याचे पुढील ''५३,६६६/-'' यास काट देऊन रु. २१,४६,४२८/-'' असे लिहीणेत येवून त्यापुढील --- ''दावा विषयाची किंमत तितकीच म्हणजे याचे पुढील ''५३,६६६/-'' यास काट देऊन रु. २१,४६,४२८/-'', असे लिहीणेत यावे.

०३. वादी पुढे असे कथन करतो की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादीचे सरनाम्यानंतर दाव्याची किंमत व विषयाची किंमत याचे पुढील ''५३,६६६/-'' यास काट देऊन रु. २१,४६,४२८/- असे लिहीणेत यावे. सदर दावा किंमत ही २१,४६,४२८/- असल्याने ''वडूज येथील मे. दि. न्या. क. स्तर साो यांचे कोर्टात'' असे लिहीण्यात यावे. प्रस्तुतची दुरुस्ती झाल्यास अर्जाचे मुळ स्वरुपात अगर

कारणामध्ये कोणताही बदल होणार नाही. अगर प्रतिवादीचे बचावावर कोणताही परिणाम होणार नाही. मात्र अशी दुरुस्ती न झाल्यास केवळ तांत्रिक कारणावरुन प्रस्तुत दावा निकाली निघाल्यास वादी यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. करीता वरील सर्व कारणांचा विचार होवून दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी, अशी वादीने विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करून सदर अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. प्रतिवादी असे कथन करतात की, वादी यांनी दाखल केलेल्या अर्जातील सर्व मजकुर अस्पष्ट स्वरुपाचा आहे, त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा. सदरील अर्जावर वादी जी दुरुस्ती करु इच्छीत आहेत, त्यानुसार योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प देणे आवश्यक आहे. त्याबद्दल कोणताही उल्लेख करणेत आलेला नाही. वरील सर्व कारणास्तव वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदा कदाचित प्रस्तुत अर्ज मंजूर करणेचे झाल्यास योग्य ते आदेश होणेस प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

०५. वादी आणि प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. प्रस्तुत अर्ज व प्रतिवादी यांचे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. माझे मते, अर्जात नमूद केलेल्या वादीच्या प्रस्तावित दुरूस्ती मथळयाचा विचार करता, प्रस्तुतची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये मागणी केलेली प्रस्तावित दुरूस्ती मंजूर केल्यास दाव्याचा गुणवत्तेवर निर्णय देणेस मदतच होणार आहे. वादी यांना प्रस्तुत दुरूस्ती करणेस परवानगी दिल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. माझ्या मते, जर प्रस्तुत दुरूस्ती अर्ज मंजूर केला तर दाव्याचे स्वरूपात फार मोठा बदल होईल अशी बाब दिसून येत नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.	वादीने नियमाप्रमाणे मुदतीत १४ दिवसांच्या आत अर्जात मागणी केल्याप्रमाणे मुळ दाव्यात दुरूस्ती करावी.

३.	वादीने दावा दुरूस्त केल्याबाबतची प्रत मूळ दाव्याचे कामी तसेच प्रतिवादी यांना देणेची आहे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2025.09.22 12:09:41 +0530

दि.१९.०९.२०२५	(एस. पी. सैय्यद)

वडूज.	२रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.